शनिवार दि. २० डिसेंबर २०१४

तरुण भारत

# दोडामार्ग महाविद्यालयाचे श्रमसंस्कार शिबीर उद्यापासून

वार्ताहर
दोडामार्ग

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे श्रमसंस्कार शिबीर २१ ते २७ डिसेंबर या कालावधीत वझरे (ता. दोडामार्ग) येथे आयोजित केले आहे.

शिबिराचे उद्घाटन २१ रोजी दुपारी २ वाजता नवनिर्माण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीपाद हळबे, संस्थेचे चेअरमन अभिजीत हेंगशेटये यांच्या हस्ते होणार आहे. अशोक बेलसरे, मलविंदरसिंग खुराना, मोहन नातू, खालीद दलवाई, सूर्यकांत परमेकर, दोडामार्ग सभापती महेश गवस, उद्योजक विवेकानंद नाईक, बाबुराव धुरी, सूचन कोरगावकर उपस्थित राहणार आहेत.

श्रमदानासह विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन. २२ रोजी दुपारी ३ वा. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे प्रकल्प अधिकारी दीपक माने यांचे 'ग्रामीण पर्यटन व शासनाची धोरणे', २३ रोजी दुपारी ३ वा. गोव्यातील प्रसिद्ध पर्यावरणतज्ज्ञ डॉ. राजेंद्र केरकर यांचे 'पर्यावरण आणि ग्रामस्वच्छता,' २४ रोजी डॉ. रामदास रेडकर यांचे 'महिलांचे कुपोषण एक समस्या', २५ रोजी दोडामार्ग पोलीस उपनिरीक्षक प्रकाश पवार यांचे 'महिला सुरक्षाविषयक कायदे'वर, २६ रोजी दुपारी ३ वाजता नेहरू युवा केंद्राचे गिरीष लवांदे यांचे 'व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर मार्गदर्शन होणार आहे.

**वझरे येथे आयोजन**

शिबीर समारोप २७ रोजी होणार असून माजीमंत्री प्रवीण भोसले, सुरेश दळवी, वझरे सरपंच सागर गवस व ग्रामसेवक शिल्पा रेडकर उपस्थित राहतील. कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. यू. दरेकर व प्रा. आर. ए. मोरे आहेत. उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केले आहे.